राज्यशासनामार्फत बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीची भरडाई करुन तुरडाळ महिला व बाल विकास विभागास पुरवठा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय, क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र.१९८/२४- स
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२
दिनांक:-२३ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ :- शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक:- सपस-२०१७/ प्र.क्र.७७/२४-स, दिनांक **२७.०४.२०१७, १६.०५.२०१७ व २६.०५.२०१७.**

प्रस्तावना :-

राज्यात हंगाम २०१६-१७ मध्ये तूरीचे मोठ्या प्रमाणात झालेले उत्पादन परिणामी तुरीची बाजारातील आवक वाढून, तुरीसाठी निश्चित केलेल्या किमान आधारभुत किंमतीपेक्षा, कमी बाजारभाव शेतकऱ्यांना मिळत असल्याने, केंद्र व राज्य शासनामार्फत वेगवेगळया योजनांतर्गत तुरीची हमी भावाने खरेदीकरण्यात आली आहे.

राज्यशासनाने स्वत:च्या निधीतून बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत २५,२५,३०३.४५ कि.ग्रॅम तुर खरेदी केली आहे. या तुरीची, तुर डाळ करुन, अंगणवाडी केंद्रातील बालकांच्या पुरक पोषण आहाराकरिता महिला व बाल विकास विभागास, तुर ते तुरडाळ रुपांतरचे At cost वर पुरविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

या संदर्भात मंत्रिमंडळाच्या निर्देशानुसार मा.मुख्य सचिव, मा.अप्पर मुख्य सचिव (वित्त) व मा.प्रधान सचिव (पणन) व मा.सचिव (महिला व बाल विकास)यांच्यासमवेत झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे तुर डाळ विक्री करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(१) महिला व बाल विकास विभागाने त्यांना लागणा-या तुर डाळीची २०१७-१८ वर्षाकरिता लागणारी महिनानिहाय एकुण मागणी, कमीत कमी १०मे.टन या प्रमाणात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांचेकडे नोंदवावी. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांनी तुर डाळ पुरवठादाराशी झालेल्या करारनामाप्रमाणे महिला व बाल विकास विभागाशी समन्वय करुन तुर डाळीच्या पुरवठयाचे नियोजन करावे.

(२) तुर डाळीचा पुरवठा, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत असलेल्या नागरी / ग्रामीण / आदिवासी प्रकल्पांसाठी महिला व बाल विकास विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार, वरील (१) प्रमाणे विहीत प्रमाणात, महिला व बाल विकास विभागाच्या सल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, यांच्यामार्फत करण्यात यावा.

(३) तुर डाळीचा पुरवठा, पुरवठा केलेल्या तुरीची रक्कम व वाहतुकीचा खर्च (लागू असल्यास) याबाबत सविस्तर सुचना, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांच्याशी चर्चा करुन अंतिम करुन घ्याव्यात व यांसदर्भात महिला व बाल विकास विभागाने स्वतंत्रपणे सविस्तर आदेश निर्गमीत करावेत.

(४) तुर डाळीचा पुरवठा निश्चित केलेल्या ठिकाणी विभागाच्या मागणीप्रमाणे १ कि.ग्रॅम पॅकिंग किंवा ५० कि.ग्रॅम पॅकिंग मध्ये पुरवठा करावा.

(५) या तुरडाळीचा पुरवठा १ कि.ग्रॅम पॅकींगसाठी रु.८० या दराने व ५० कि.ग्रॅम पॅकींगसाठी रु.७५ या प्रति कि.ग्रॅम दराने (रु.३,७५०/- फक्त ५० कि.ग्रॅम पॅकींगसाठी लागूल राहिल) करण्यात यावा.

(६) महिला व बाल विकास विभागाच्या मागणीप्रमाणे तुरडाळीचा पुरवठा करणे व पुरवठा केलेल्या तुर डाळीची रक्कम वसुल करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई याची राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६११२५३९७००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2017.10.26 11:15:25 +05'30'

(का.गो.वळवी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (महिला व बाल विकास) मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा.सचिव (महिला व बाल विकास) मंत्रालय, मुंबई
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई,
१०. पणन संचालक, महाराष्ट राज्य, पुणे